# प्रकरण चार

## पशुसंवर्धन विभाग

**4.458 आदिवासी उप-योजनेंतर्गत अनुसूचीत जमाती लाभार्थ्यांना शेळी गट वाटप करणे (TSP).**

**पंचायत समिती भिवंडी, जिल्हा ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** आदिवासी उप-योजनेंतर्गत अनुसूचित जमाती लाभार्थ्यांना शेळी गट वाटप योजनेकरीता रुपये 1,43,544/- इतका खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खालील लाभार्थ्यांचे स्वत:चे नावे 7/12 मध्ये नसताना लाभ दिलेला आहे.

श्री.संतोष धाक्या भांगरे यांच्या आईच्या नावे 7/12 आहे.

श्री. कृष्णकांत वामन कानात यांच्या नावे वनजमीन अतिक्रमण आहे.

तसेच त्यांच्या जनावरे घेतलेल्या ताबा पावत्यावर दिनांक नमूद नाही. योजनेतील अटी व शर्ती पूर्ण होत नसतांना देखिल लाभार्थ्यांना दिलेली रक्कम अनुक्रमे रुपये 35,886/- प्रती लाभार्थी प्रमाणे रुपये 71,772/- वसुल करावी अन्यथा लेखापरीक्षणास दस्तऐवज सादर करावेत.

2) लाभार्थ्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीत आढळून आले नाही.

3) योजनेच्या खर्चाचा अहवाल, फलश्रुती अहवाल जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडे सादर केल्याचे नस्तीत आढळून आले नाही.

4) शासन निर्णय क्रमांक डिसीटी2316/प्र.क्र.133/का-1417, दिनांक 03/03/2017 अन्वये रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांना बँक खात्यात रक्कम जमा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तरी लाभार्थ्यांचे बँक स्टेटमेंटसह अनुपालन सादर करावे.

**4.459 आदिवासी क्षेत्र योजनेंतर्गत लाभार्थ्यांना 2 दुधाळ जनावरांचा गट वाटप करणे (TSP)**

**पंचायत समिती भिवंडी, जिल्हा ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** आदिवासी क्षेत्र योजनेंतर्गत लाभार्थ्यांना 2 दुधाळ जनावरांचा गट वाटप योजनेकरीता रुपये 1,91,388/- इतका खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री. दत्तू लहू शेंडे या लाभार्थ्यांची निवड केली असतांना श्री. दत्तू कमळू शेंडे यांना लाभ दिला असून त्यांचे नावे 7/12 चा उतारा नाही. तरी त्यांना दिलेली रक्कम रुपये 31,898/- वसुल करावी.

2) लाभार्थ्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीत आढळून आले नाही.

3) योजनेच्या खर्चाचा अहवाल, फलश्रुती अहवाल जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडे सादर केल्याचे नस्तीत आढळून आले नाही.

4) शासन निर्णय क्रमांक डिसीटी-2316/प्र.क्र.133/का-1417, दिनांक 03/03/2017 अन्वये रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांना बँक खात्यात रक्कम जमा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही. तरी लाभार्थ्यांचे बँक स्टेटमेंटसह अनुपालन सादर करावे.

**4.460 आदिवासी उपयोजना 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावराचे गट वाटपाबाबत.**

**पंचायत समिती शहापुर, जिल्हा ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,91,388/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक दुध.एस.आय 10/2001/प्र.क्र.51/ दुग्ध/4, दिनांक 27/02/2002 नुसार राज्यात नियमित भरणाऱ्या बाजारात जनावरांना लाळया, खुरकुत रोग लसीकरण करणे अनिवार्य असताना बाजारातून खरेदी केलेल्या पावतीमध्ये अशा प्रतिबंधक लसी केल्याच्या नोंदी आढळून आलेल्या नाहीत.

2) सदर दुधाळ जनावराची महाराष्ट्र ॲनिमल आयडेंटिफिकेशन ॲन्ड रेकॉर्डिंग ॲथारिटी हयांचेकडे नोंदणी बंधनकारक असून पशुवैदयकिय आरोग्य प्रमाणपत्र नोंदवहीमध्ये जनावरांचे वर्णन व किंमत नमूद नाही. शासन निकषानुसार कार्यवाही केल्याचे आढळत नाही.

3) संकरीत म्हशीचा विमा खरेदी काळात उतरविणे आवश्यक असताना विमा विलंबाने उतरविलेला आहे.

4) पशुविकास अधिकारी यांनी दर 3 महिन्यांनी प्रत्येक जनावरांची पडताळणी करणे व अहवाल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना देणे तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी तसेच पशुसंवर्धन सहआयुक्त यांनी 10 टक्के जनावरांची पडताळणी करणे, लाभार्थीची अडचण समजावून घेणे व तांत्रिक मार्गदर्शन देणे इत्यादी सुचना असतांना वरिष्ठ पातळीवरुन तसे केल्याचे दिसून आले नाही.

5) योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना मुद्दा क्रमांक 5 नुसार तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी प्राप्त अर्जांचे तारखेसहित रजिस्टर ठेवणे आवश्यक असूनही असे रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही.

6) योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना मुद्दा क्रमांक 11 नुसार म्हशी खरेदी करताना मुऱ्हा, जाफराबादी या संकरीत म्हशी प्रतिदिन 10 ते 12 लिटर दुध देणाऱ्या, दुसऱ्या व तिसऱ्या वेतातील 15 ते 30 दिवसांपूर्वी व्यायलेल्या म्हशींचे वाटप करावे, असे निर्देश आहेत. मात्र खरेदी केलेल्या म्हशी अशा प्रकारच्या असल्याबाबतचा पशु वैदयकीय अधिकारी यांनी प्रमाणित केलेले नाही.

7) योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना मुद्दा क्रमांक 9 नुसार एकाच कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ दयावा, असे असूनही श्री.राजू नवसू खंडवी व श्री.किसन नवसू खंडवी या एकाच कुटुंबातील दोन सदस्यांना लाभ दिलेला असल्याचे अर्जासोबतच्या रेशनकार्ड वरून स्पष्ट होत आहे. यास्तव एका व्यक्तीकडून रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. वसूलपात्र रक्कम रुपये 31,898/- वसूल करून तसे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

**4.461 पशुसंवर्धन विभागकडील औषध साठा नोंदवहीबाबत.**

**पंचायत समिती उरण, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) गट स्तरावर व दवाखाना येथे औषधाचे एक्सपायरी (expiry register) नोंदवही ठेवणे आवश्यक असताना ठेवलेले नाही.

2) औषध साठा नोंदवहीत औषधाची बॅच क्रमांक, औषध निर्माण दिनांक, एक्सपायरी (expiry) दिनांक नमूद करणे आवश्यक असताना ते नमूद केलेले नाही.

3) गट स्तरावरून औषधाची मागणी घेवून त्याप्रमाणे औषधाचा पुरवठा करणे आवश्यक असताना तशाप्रकारे कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे अनावश्यक औषधाचे पुरवठा झाल्याची शक्यता आहे

4) जिल्हा परिषदेकडून औषधाचा पुरवठा कधी केला, तो दिनांक नमूद नाही. तसेच चलन क्रमांक नाही. त्यामुळे औषधे विहित मुदतीत मिळल्याची तपसणी करता आली नाही.

**4.462 पशुसवंर्धन विभागाकडील 75 टक्के अनुदानातील नियमबाहयतेबाबत.**

**पंचायत समिती कर्जत, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत रक्कम रुपये 5,34,669/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार लाभार्थी निवड करणे आवश्यक असतांना उपरोक्त योजनांच्या नस्तीसोबत पशुसंवर्धन समिती, जिल्हा परिषद, रायगड यांनी मंजूर केलेली लाभार्थी यादी अप्राप्त असतांना वरील लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे दिसून येते.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-2007/प्र.क्र.29/योज-.07, दिनांक 12/10/2007 नुसार योजनेतील 3 टक्के लाभार्थी असणे आवश्यक असतांना याप्रमाणे उचित कार्यवाही झाल्याचे अभिलेखे नस्तीसोबत उपलब्ध झाले नाहीत. उचित कार्यवाहीसह पुर्तता दाखवावी.

3) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर-1633/578, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा जमा केल्याशिवाय योजनेतील वस्तू खरेदी करू नये, असे असतांना उपरोक्त योजनेबाबत उचित कार्यवाही न करता योजना राबविल्याचे दिसून येते. नियमबाहयतेबाबत उचित कार्यवाहीसह पुर्तता आवश्यक आहे.

**4.463 महिलांना 75 टक्के अनुदानावर कोंबडयांचा पिंजरा / पक्षीगृह वाटप करणे.**

**पंचायत समिती सुधागडपाली, जिल्हा रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 13) -** याबाबत रक्कम रुपये 9,99,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विभाग व मस्त्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदम-4, दिनांक 11 नोव्हेंबर नुसार जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीने निवड केलेल्या लाभार्थींची यादी आयुक्त, पशुसंवर्धन तसेच जिल्हयाचे जिल्हाधिकारी तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या संकेत स्थळावर व निवड झालेल्या लाभर्थ्यांना कळविणे, अशी कार्यवाही करणे आवश्यक होती. परंतू, याबाबत नस्तीसोबत कोणतेही दस्तऐवज नाही.

2) योजनेसाठी लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर झाल्यावर लाभर्थ्यांनी एक महिन्याच्या कालावधीत हिश्याची रक्कम अथवा बँकेचे कर्ज उभारणे आवश्यक राहील. परंतू, तशी माहीती नस्ती सोबत नाही.

3) आदिवासी क्षेत्राबाहेरील / आदीवासी क्षेत्र उपाययोजना अंतर्गत पुढील पाच वर्षासाठी लाभ देता येणार नाही. यासाठी अशा लाभार्थ्यांची यादी संबंधीत ग्रामपंचायतीस विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प यांना पाठवून सदर लाभार्थ्यांना वरील योजनेतून मागील पाच वर्षात लाभ दिला गेला आहे किंवा कसे, याची खात्री जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी केलेली नाही.

4) अंमलबजावणी अधिकाऱ्याने या योजनेस सर्व प्रकारच्या प्रसिध्दीमाध्यमाद्वारे व्यापक प्रसिध्दी देऊन लाभार्थ्यांकडून अर्ज मागविणे आवश्यक होते. परंतू, तसे केल्याचे नस्तीसोबत दिसून आले नाही.

5) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/2011/प्रक्र.414/पदुम-4, दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थ्यांना प्रसिध्दी देऊन लाभार्थ्यांकडून सदर योजनेचा लाभ देणे आवश्यक होते. परंतू, तसे केल्याचे नस्तीसोबत दिसून येत नाही.

6) तालुकास्तरीय अधिकाऱ्याने लाभर्थ्यांचे अर्ज स्विकारून प्राप्त झालेली सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडे जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करणे आहे व प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची तारीखनिहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यात यावी. परंतू, तशा प्रकारे कार्यवाही जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी केलेली नाही.

7) पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी त्यांच्या तालुक्यात वाटप केलेल्या एकूण गवत कापणी यंत्र ची 25 टक्के प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना पाठविणे आवश्यक होता. परंतू, वरील बाबत कोणतेही कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

8) सदर योजनेच्या नस्तीसोबत मुद्रांक पेपर जोडले नाहीत व त्या पेपरवर करारनामा केलेला नाही.

9) पुरवठा आदेशामध्ये साहित्य किती दिवसात पुरवठा करावा? हे नमुद नाही. तसेच उशीराने पुरवठा केल्यास किती टक्के दंड भरावा लागेल? हे नमुद केलेले नाही. साहित्य पुरवठा चलनावर दिनांक नमुद नाही. संबंधीत कंत्राटदाराचे हित जोपासले आहे. उशीराने प्राप्त झालेल्या वस्तूवर दंडाची रक्कम प्रगणीत करून वसूल करावी.

10) पुरवठा झालेल्या पक्षीगृहाची गुणात्मक आणि संख्यात्मक तपासणी झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत प्राप्त पुरवठयाची रक्कम अदा करावी, असे निर्देश असतांना सुध्दा विभागाने तद्पुर्वीच रक्कम अदा केलेली आहे.

**4.464 विशेष घटक योजनेअंतर्गत 02 दुधाळ गट वाटप अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती दापोली, जिल्हा रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,55,184/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) विशेष घटक योजने अंतर्गत अनुसुचित जाती व नवबौद्ध यांना 02 दुधाळ जनावरे गट वाटप करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व पशुसंवर्धन विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे लाभार्थ्यांची निवड होणे आवश्यक आहे. मात्र वेळोवेळी निर्गमित झालेले शासन निर्णय तसेच विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लाभार्थ्यांची निवड केल्याचे अभिलेख नस्तीत दिसून आलेले नाहीत. त्याबाबत लाभार्थ्यांची निवड नियमानुसार करण्यात आल्याची खात्री करता आलेली नाही.

2) अनुसुचित जातीच्या लाभार्थीची निवड करतांना त्यांचे जातीचे प्रमाणपत्र व विहीत मर्यादेपेक्षा जादा जमीन असल्याचे अभिलेख तसेच पशुपालनाबाबत प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. मात्र एकूण 09 अर्जापैकी 04 अर्ज कोणत्या आधारे लाभास पात्र ठरविण्यात आले, याबाबतचे कोणतेही अभिलेख नस्तीत नाहीत.

3) निवडण्यात आलेल्या एकूण 04 लाभार्थीपैकी कोणाचेही दारिद्र्य रेषेखालील दाखले घेण्यात आलेले नाहीत. तसेच श्री. चंद्रकांत जाधव यांनी अर्जात प्रशिक्षण घेतल्याचे नमूद केले आहे. मात्र नस्तीत त्याबाबत कोणतेही अभिलेख आढळून आलेले नाहीत.

4) वरील 04 लाभार्थ्यांना 02 दुधाळ जनावरांचे गट वाटप करण्यात आले असून याबाबतची नोंदवही तपासली असता या नोंदवहीतील रकाना क्रमांक 8 ते 10 नुसार सदर जनावरांची सद्यस्थिती, दुध उत्पादन, गाभन/ भाकड/ व्यालेली याबाबत पाठपुरावा केला जात नसल्याचे दिसून येते.

**4.465 विशेष घटक योजनांतर्गत अनुसूचित जाती / नवबौध्द लाभार्थीना दुभत्या जनावरांना खाद्य वाटप करणे.**

**पंचायत समिती सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जाती / नवबौध्द लाभार्थीना दुभत्या जनावरासाठी खाद्य वाटप करणेसाठी मंजूर केलेल्या लाभार्थीना रोख स्वरुपात अनुदान रक्कम रूपये 84,987/- थेट बॅक खात्यात वर्ग केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या रसिका रामकृष्ण देवसूकर या लाभार्थ्यांचा जातीचा दाखला पडताळणीसाठी उपलब्ध झाला नाही. तरी अनुदान लाभार्थ्याच्या खात्यात थेट कसे वर्ग करण्यांत आले, याचा खुलासा करावा.

2) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांचे पत्र क्रमांक जिप/1220/2017, दिनांक 02/02/2017 अन्वये दिलेल्या सूचनेनुसार आधारकार्ड खाते क्रमांक याची झेरॉक्स प्रत लाभार्थ्याने सादर करणे अनिवार्य असताना 7 लाभार्थ्यांचे आधारकार्डची झेरॉक्सप्रत नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही. ती उपलब्ध करुन लेखापरीक्षणास सादर करावी.

शासन निर्णय दिनांक 05/12/2016 अन्वये लाभार्थ्यांची यादी तयार करुन लाभार्थ्यांचा आधार क्रमांक न घेता अनुदान थेट कसे जमा केले, याचा खुलासा करावा.

3) शासन निर्णय क्रमांक डीसीटी 2316/प्रक्र133/का1417, दिनांक 05/12/2016 अन्वये लाभार्थ्यांने खरेदी केलेल्या वस्तूची व सादर केलेल्या पावतीची शहानिशा संबंधित यंत्रणेने करणेची आहे. तरी याबाबत लाभार्थ्यांने खरेदी केलेल्या पशुखाद्याची ते सुस्थितीत आणि योग्य दर्जाचे असल्याची खात्री संबंधित यंत्रणेने करणेची आहे व खात्री झाल्यावरच अनुज्ञेय अनुदान थेट खात्यात जमा करावयाचे आहे. तथापि, लाभार्थ्यांने खरेदी केलेल्या साहित्याची (पशुखाद्य) दर्जाबाबत सक्षम अधिका-यांनी प्रमाणित केलेला अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा.

**4.466 जिल्हा वार्षिक योजना (2015-16) विशेष पशुधन उत्पादन कार्यक्रम योजना.**

**पंचायत समिती सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2015-2016 मधून वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम अंतर्गत (50 टक्के अनुदान)

अनुदान उपलब्ध झालेनुसार संकरीत / देशी गोवंशीय कालवडी व सुधारी / देशी म्हशीच्या पारडयांची जोपासना करण्यासाठी सन 2015-2016 मधील अखर्चित तरतूदीमधून निवड केलेल्या लाभार्थींना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचे आदेश क्रमांक 1416 दिनांक 30/03/2017 अन्वये प्रशासकिय / वित्तीय मान्यता प्राप्त झालेनुसार एकूण 10 लाभार्थींना रक्कम रुपये 40,000/- अनुदान वितरीत केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) वरील योजनेसाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी त्यांचेकडील आदेश क्रमांक 1416 दिनांक 30/03/2017 अन्वये एकूण 12 लाभार्थ्यांसाठी अनुदान उपलब्ध करुन दिले आहे. प्रत्यक्षांत 10 लाभार्थ्यांनाच योजनेचा लाभ दिला आहे, तरी उर्वरीत दोन लाभार्थ्यांना लाभ का दिला नाही, याचा खुलासा करावा.

2) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्गयांनी प्रशासकिय मंजूरी आदेशांत दिलेल्या सूचनेनुसार लाभार्थीने खरेदी केलेल्या पशुखाद्याची खरेदी केल्याची व पशुखाद्य सुस्थितीत आणि योग्य दर्जाचे असल्याची खात्री पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती व संबंधित पशुवैद्यकिय संस्था प्रमुख यांनी करणेची आहे व तशी खात्री झाल्यावरच अनुज्ञेय अनुदान थेट खात्यात जमा करावयाचे आहे. तथापि, लाभार्थ्यांने खरेदी केलेल्या पशुखाद्याच्या दर्जाबाबत सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेला अहवाल नस्तीमध्ये आढळून आला नाही.

**4.467 विशेष घटक योजना अंतर्गत अनुसूचित जाती / नवबौद्ध लाभार्थीकडील दुधाळ जनावरांना खाद्यासाठी अनुदान वाटप करणे.**

**पंचायत समिती वैभववाडी, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** याबाबत रक्कम रुपये 89,998/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

1) लाभार्थ्यांनी खरेदी केलेल्या पशुखाद्याच्या बिलावर पशुखाद्याचा बँच क्रमांक व दिनांक इत्यादी नमूद असणे आवश्यक होते. परंतु, काही लाभार्थ्यांचा खरेदी बिलावर तसे नमूद नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 20 नुसार प्रदान केलेल्या रक्कमेची पोच घेणे आवश्यक असताना रक्कम मिळाल्या बाबत लाभार्थ्यांच्या मुद्रांकित पोच घेण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे लाभार्थ्यांना अनुदान प्राप्त झाल्याबाबत पडताळणी करता आलेली नाही.

3) लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे लाभ दुबार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) लाभार्थ्यांचे उपयोगिता दाखले घेण्यात आलेले नाहीत.

**4.468 कामधेनू दत्तकग्राम योजना खर्चाबाबत.**

**पंचायत समिती सिंदखेडा, जिल्हा धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 54) -** पंचायत समिती, शिंदखेडा सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात पशुसंवर्धन विभागाकडील कामधेनू दत्तकग्राम योजनेची नस्ती संबंधित शासन निर्णय क्रमांक नापुयो/2010/प्र.क्र.50/पदुम-4, दिनांक 29/10/2010 मधील तरतुदीच्या अटी शर्तीच्या अनुषंगाने सदर योजनेवर रक्कम रुपये 1,32,916/- खर्च करण्यात आला आहे. त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहे:-

1) आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जावक क्रमांक एफवायपी II(ii) 752 (भाग 3) 2011, पं.स6, दिनांक 13/04/2012 अन्वये कामधेनू दत्तक ग्रामयोजना राबविणेसाठी मंजूरी देवून मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. सदरची योजना शासन निर्णय क्रमांक नापुयो/2010/प्र.क्र.50/पदुम-4, दिनांक 29/10/2010 अन्वये अंमलबजावणी करण्याबाबत सुचित केले आहे.

2) मार्गदर्शक सुचनांमधील आराखडा तयार करतांना अनुक्रमांक 2 नुसार दत्तक ग्राम योजने अंतर्गत निवड केलेल्या गावामध्ये ज्या पशुपालकाकडे जास्त पशुधन घटक संख्या आहे, अशा सभासदांची निवड करुन निवड

केलेल्या सभासदांची बैठक घेवून त्यापैकी 9 सभासदांचे पदाधिकारी मंडळ स्थापन करुन स्थापन केलेल्या मंडळास स्थानिक नाव देऊन त्यांची नोंदणी धर्मदाय आयुक्त यांचेकडुन करण्याबाबत सुचित केलेले आहेत. तथापि, सुचनेनुसार मंडळ सभासदांमधून निवड केल्याचे अभिलेखे नस्तीसोबत नाहीत. धर्मदाय आयुक्ताकडे पशुपालन मंडळाची नोंदणी कामी खर्च केलेचे दिसून येत नाही. याचाच अर्थ पशुपालन मंडळ स्थापन करण्यात आलेले नाही. तथापि, धर्मदाय आयुक्तांकडील नोंदणीचे कागदपत्र नस्तीबध्द केलेली नाहीत.

3) आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक 13/04/2012 च्या मार्गदर्शक सुचनेच्या अनुक्रमांक 2 नुसार पशुपालन मंडळ स्थापन करुन सहलीचे आयोजन करणेबाबत सुचित केले आहे. पशुपालकांसाठी सहलीचे आयोजन करतांना मंडळातील पशुपालकांना प्राधान्य देवून ठिकाण निश्चित करणेसाठी दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी पालन इत्यादी पशुसंवर्धन विभागाशी संबंधित असलेल्या सर्वोकृष्ट अशा संस्था / व्यवसाय असलेले ठिकाणांना प्राधान्य देणेबाबत सुचित केले आहे. तथापि, मार्गदर्शक सुचनेनुसार ठिकाण निवड केल्याचे अभिलेखे दप्तरी नाही.

4) सदर योजने अंतर्गत पशुपालक मंडळासाठी सहलीचे आयोजन केलेले आहे. सहलीसाठी परिवहन मंडळासाठी सहलीचे आयोजन केलेले आहे. सहलीसाठी परिवहन महामंडळाकडुन भाडयाचे दर, किलोमीटर, निमआराम बस, साधी बस, याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती न घेता पंचायत समितीने खाजगी वाहनांचा उपयोग केलेला आहे. दरपत्रक मागविण्यात आलेले नाही.

5) प्रमाणक क्रमांक 137 दिनांक 31/03/2017 शेतक-यांच्या शैक्षणिक सहलीसाठी पिंपारणे सार्वे ते राहुरी विदयापीठ अशी सहल दिनांक 24/03/2017 रोजी प्रवास केला असल्याचे उपप्रमाणक, वाहन चालक राजेंद्र दामोदर सिसोदे, गरीब नबाव ट्रॅव्हर्स यांच्या पोहचवरुन समजते. परंतु, राहुरी कृषी विदयापीठाची सेवा शुल्काची पावती दिनांक 23/03/2017 रोजी रूपये 100/- रक्कमेची असून तारखेमध्ये विसंगती आढळते. तरी सदर खर्च रक्कम रुपये 7,000/- लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

6) अ. पुरवठादाराकडुन आयकर अधिनियम 1961 नियम 194(क) अन्वये 2 टक्के आयकर रक्कम रुपये 1,842/- कपात न करण्याचे प्रयोजन नस्तीसोबत नसतांना पुरवठादारांचे हित जोपासून शासन महसुलाचे नुकसान केलेले आहे.

ब. सदरचे साहित्य उचित दर्जा व गुणवत्तेचे तसेच विनिर्देशाप्रमाणे बरोबर असल्याचा तपासणी अहवाल नसतांना पूर्ण रक्कम अदा करण्यात येवून उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस/1088/(2512)उदयोग-6, दिनांक 02/01/1992 मधील नियमांचे उल्लंघन करण्यात आलेले आहे.

आयकर रक्कम रुपये 1,842/- व सहलीची रक्कम रुपये 7,000/- लेखापरीक्षणात अंतिम अमान्य करण्यात येत आहे. उर्वरीत रक्कम रुपये 1,24,047/- लेखापरीक्षणात उपरोक्त उणिवांमुळे तात्पुरती अमान्य करण्यात येत आहे.

**4.469 पशुसंवर्धन कामधेनु योजना खर्चाबाबत.**

**पंचायत समिती इंदापूर, जिल्हा पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती, इंदापूर यांचेकडील सन 2016 -2017 चे लेखापरीक्षण कालावधीतील कामधेनु योजना अंतर्गत रक्कम रुपये 8,27,678/- एवढा खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.55/34, दिनांक 05/10/1989 अन्वये वैयक्तिक लाभ देण्यांत आलेल्या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यांत आलेली नाही. मास्टर नोंदवही वर्षनिहाय व गावनिहाय ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे एकाच कुटूंबातील एकापेक्षा अनेक व्यक्तींना म्हणजेच दुबार लाभ दिला गेला नसलेबाबतची तपासणी करतां आलेली नाही.

2) अनुदान अदा केलेल्या लाभार्थीकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

3) पशुसंवर्धन कामधेनु योजाने अंतर्गत एकूण 23 गावांची निवड केलेबाबत निकष / मंजूर आदेश नस्तीसोबत उपलब्ध केलेले नाहीत.

4) उद्योग व उर्जा विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली नाही.

**4.470 सेवाशुल्क मधून केलेल्या वाहतूक खर्चाबाबत**

**पंचायत समिती खानापूर विटा, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 27) -** पशुसंवर्धन विभागाने सेवा शुल्क रक्कमेमधून औषध वाहतुकीसाठी रक्कम रूपये 88,610/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सेवा शुल्क -2010 /प्र.क्र.326/पदम-4, दिनांक 11/10/2010 अन्वये सेवाशुल्क मधून बळकटीकरणाअंतर्गत खर्च करणे आवश्यक असताना शासन पूरक पत्र दिनांक 30/07/2013 अन्वये बाब क्रमांक 7 जिल्हा तालुका स्तरावर विविध बाबीची वाहतूक करण्यासाठी येणारा खर्च ही, बाब नव्याने समाविष्ट केली आहे. परंतु, पंचायत समिती विटाकडील पशुसंवर्धन विभागाने वाहतुकीवर प्राप्त अनुदानातून खर्च केलेला आहे

तसेच सदर खर्च प्राप्त अनुदानाच्या 28 टक्के केलेला आहे. तसेच वाहतुकीवर खर्च मोठ्या प्रमाणावर केल्याचे दिसून येते. प्राप्त अनुदानातून केलेल्या खर्चामुळे कोणते बळकटीकरण झाले? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.471 पशुवैद्यकीय सेवा शुल्क प्राप्त रकमेतून नियमबाहय केलेल्या खर्चाबाबत**

**पंचायत समिती कडेगाव, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 23) -** पशुवैद्यकीय सेवा शुल्क प्राप्त रक्कम रूपये 62,810/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विभाग, मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सेवाशुल्क-2010/प्र.क्र.326/पदम-4, दिनांक 11/10/2010 अन्वये सदर सेवाशुल्कच्या विनियोग केवळ जिल्हा परिषदेकडील संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याच्या बळकटीसाठीच 6 बाबीवर खर्च करता येतो.

तथापि, सदर शासन निर्णयास दिनांक 30/07/2013 रोजी शासन पूरक पत्राद्वारे बाब क्रमांक 7 जिल्हा तालुका स्तरावर औषधी, लसमात्रा, हत्यारे, उपकरणे, बियाणे, पशुखाद्य, स्टेशनरी इत्यादी बाबीची वाहतूक पशुवैद्यकीय दवाखान्यपर्यंत करण्यासाठी येणारा वाहतूक खर्च ही, बाब नव्याने समाविष्ट केली आहे.

2) पंचायत समिती, कडेगावकडील पशुवैद्यकीय दवाखान्यांनी सेवाशुल्क रकमेतून वाहतूक भाडेपोटी रक्कम रूपये 62,810/- इतका खर्च केला आहे. प्राप्त सेवाशुल्काची रक्कम पशुवैद्यकीय दवाखाना, उपकेंद्रे यांच्या बळकटीकरणासाठी जास्तीत जास्त निधी उपयोगात आणणे आवश्यक होते. तसे केले नाही. शासन पूरक पत्रकामध्ये खर्चाची मर्यादा दिली नसल्याने फक्त वाहतूक भाडेपोटी जास्त रक्कम खर्च केल्याचे दिसून येते त्यामुळे शासनाचा पशुवैद्यकीय दवाखानांचे बळकटीकरणाचा हेतू सफल झालेला नाही.

3) पशुवैद्यकीय दवाखान्याने वाहतूक भाडेपोटी केलेल्या खर्चाबाबत औषध, लसमात्रा, हत्यारे, उपकरणे, बियाणे, पशुखाद्य, स्टेशनरी इत्यादी कारणासाठी वाहतूक केले. त्याचे संबंधित औषध साठा नोंदवही व कागदपत्रे सादर करून खात्री पटवावी.

**4.472 अनुसूचित जाती उपयोजना दोन दुधाळ जनावरे गट वाटप.**

**पंचायत समिती शिरोळ, जिल्हा कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती, शिरोळ सन 2016-2017 लेखापरिक्षणात पशुसंवर्धन विभागामार्फत 2403 पशुसंवर्धन 102 पशु व म्हैस विकास या लेखाशिर्षाखाली प्रमाणक क्रमांक 228 दिनांक 31/03/2017 अन्वये 33 लाभार्थ्यांना प्रती म्हैस 31,898/- प्रमाणे (विमा रक्कम रूपये 1,898/-) रक्कम रुपये 10,52,634/- म्हैस गट वाटप करण्यावर खर्च केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा पशुधन अधिकारी, जिल्हा परिषद यांचे पत्र क्रमांक जिप/पशुस/तां/28/2017, दिनांक 20/01/2017 अन्वये शिरोळ गटासाठी 34 लाभार्थ्यांकरीता प्रती लाभार्थी दोन म्हशींकरीता रूपये 63,796/- (विमा रक्कम रूपये 3,796/-) प्रमाणे रूपये 21,69,064/- इतका निधी उपलब्ध केलेला आहे. परंतु, पशुसंवर्धन विभागाने 33 लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे. एका लाभार्थ्याने म्हैस खरेदी न केल्याने त्याची रक्कम रूपये 63,796/- नाहक अडकून पडली आहे.

2) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य विभाग, शासन निर्णय तथा योजनेस प्रशासकीय मंजुरी आदेश क्रमांक जिवायो/2011/प्रक्रं 304/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील योजनेतील मार्गदर्शक सुचनांनुसार विशेष घटक योजनेतील अनुसुचित जाती / जमाती मधील लाभार्थ्यांना 2 दुभत्या संकरीत गाई किंवा मु-हा, जाफराबादी या दुधाळ जातीमधील दुभत्या म्हशी सदर योजना राबविताना प्रथमत: एका दुधाळ जनावराचे वाटप करणेचे असून सहा महिन्यानंतर किंवा वाटप केलेले जनावर अटल्यानंतर दुसरे जनावर वाटप करणे आवश्यक आहे. तथापि, पहिले जनावर वाटप करून माहे ऑक्टोंबर 2017 अखेर सात महिने कालावधी पूर्ण झालेला असताना अद्याप दुसरे जनावर लाभार्थ्यास वाटप केलेले नाही. त्यामुळे लाभार्थ्यास यापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे.

3) सदर योजनेंतर्गत खरेदी केलेल्या जनावरांची महाराष्ट्र ॲनिमाल आयडेंटीफिकेशन ॲन्ड रेकॉर्डिंग ॲथोरिटी यांचाकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. अशी नोंदणी केलेली नाही.

**4.473 विशेष घटक योजने अंतर्गत अनुसुचीत जाती / नवबौध्द लाभार्थ्यांना दुधाळ गाय व म्हैस गट वाटपाबाबत.**

**पंचायत समिती पंढरपूर, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 47) -** पंचायत समिती, पंढरपूरचे सन 2016-2017 या वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये पशुसंवर्धन विभागाकडील 75 टक्के विशेष घटक योजने अंतर्गत अनुसुचीत जाती / नवबौध्द लाभार्थ्यांना दुधाळ गाय वाटपाबाबतची नस्तीची व प्रमाणकांची तपासणी केली दुधाळ गाय /म्हैस वाटपापोटी खर्च रक्कम रुपये 3,50,878/- नोंदवला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय 02/01/2011 परिच्छेद क्रमांक 10 मध्ये ही योजना शक्यतो क्लस्टर स्वरुपात आणि अस्तित्वातील /प्रस्तावीत दुध संकलन मार्गावरील गावामध्ये राबवीणेत यावी तसे केलेबाबत दिसून येत नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयान्वये तालुकास्तरावरील अधिकारी अर्ज स्विकारुन प्राप्त झालेले अर्ज जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परीषद, सोलापूर यांचेकडे जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करावेत. प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची तारीखनिहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यांत आलेली नाही. अर्जावर केंव्हा प्राप्त झाले ती तारीख नमूद केलेली नाही.

3) उपरोक्त शासन निर्णय स्तंभ क्रमांक 12 मध्ये जनावर खरेदी समिती गावातील प्राथमिक सहकारी दुध संस्थेचे प्रतिनिधी, बँक प्रतिनिधी व विमा प्रतिनिधी यांचा समावेश केल्याचे दाखवावे.

4) उपरोक्त शासन निर्णय स्तंभ क्रमांक 13 मध्ये दुभत्या जनावरांची खरेदी शक्यतो राज्याबाहेरील नामांकित बाजारपेठेमधून करणे आवश्यक असतांना स्थानिक बाजारपेठ, कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगोला व कुर्डूवाडी (माढा) येथे दिनांक 25/02/2017 व 05/03/2017 रोजी खरेदी केले आहे.

5) उपरोक्त शासन निर्णय स्तंभ क्रमांक 15 मध्ये सदर दुभत्या जनावरांची महाराष्ट्र ॲनीमॅल आयडेंटीफिकेशन अँड रेकॉर्ड ॲथॉरीटी यांच्याकडे नोंदणी बंधनकारक असतांना तशी नोंदणी केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-1013/प्र.क्रं./1239/34, दिनांक 02/09/1993 मधील परीच्छेद क्रमांक 4 नुसार लाभार्थ्यांना पंचायत समिती व गांवनिहाय मास्टर नोंदवही ठेवली नसल्याने योजनेचा दुबार लाभ दिला नसल्याची खात्री होत नाही.

7) पशुविकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांच्या 25 टक्के जनावरांची पडताळणी करावी. तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी 10 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल वरिष्ठांस सादर करावा, असे असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

8) जनावरांचे विमा युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी यांचेकडून दिनांक 14/03/2017 व 22/03/2017 रोजी घेण्यात आलेला आहे. याबाबत खुलासा करावा. तसेच दोन लाभार्थीचे विमा उपलब्ध झाले नाहीत. ते उपलब्ध करुन देणेत यावे.

**4.474 पशुसंवर्धन विभागाकडील विहित कालावधीत संगणक परीक्षा उत्तीर्ण नसतांना जादा अदा वेतनवाढीबाबत.**

**पंचायत समिती कुर्डुवाडी, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 26) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, कुर्डुवाडीच्या पशुसंवर्धन विभागाकडील सेवापुस्तके तपासली असता खालील तपशिलात नमूद पशुधन पर्यवेक्षक हे दिनांक 31/12/2007 मुदतीत संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत. तपशिलात नमुद केल्याप्रमाणे विहित मुदतीनंतरही अदयाप उत्तीर्ण नाहीत / विहित मूदतीनंतर संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांना दिनांक 01/07/2008 ते संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकादरम्यान जादा वेतन प्रदान झाले आहे आणि होत आहे. तरी रक्कम रूपये 6,26,997/- वसूली करणेत यावी.

2) जे कर्मचारी संगणक अर्हता चाचणी परीक्षा उत्तीर्ण नाहीत / मुदतीत उत्तीर्ण नाहीत, त्यांना होत असलेले अतिप्रदान रोखून अतिप्रदानीत रक्कम वसुल करणेची कार्यवाही कां केली नाही? याबाबत समर्पक खुलासा करावा.

3) आक्षेपात नमुद कर्मचा-यांची नांवे चाचणी लेखापरिक्षणांत आढळले असून पंचायत समिती, कुर्डूवाडीकडील सर्व कर्मचा-यांची सेवापुस्तके तपासून जे कर्मचारी संगणक अर्हता चाचणी परीक्षा अदयाप उत्तीर्ण नाहीत किंवा उशीरा उत्तीर्ण झाले आाहेत, त्यांना होत असलेले अतिप्रदान रोखावे व अतिप्रदान रक्कमेची गणना करुन वसुलीची कार्यवाही करुन अनुपालन करावे.

**4.475 विशेष घटक योजना व ओटीएसपी योजना अंतर्गत 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती मालेगांव, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 58) -** पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, मालेगाव अंतर्गत 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप करणेकरीता विशेष घटक योजना व ओ.टी.एस.पी. योजने अंतर्गत उपायुक्त पशु (नि व अ) पशु आयुक्तालय, पुणे यांच्या वितरण आदेशानुसार दुधाळ जनावरे वाटप करण्यात आले आहे. सदरबाबत रक्कम रुपये 10,20,,732/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 नुसार शासनाने अनुसुचित जातीच्या लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराकरीता उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. नमुद शासन निर्णयातील आदेशान्वये लाभार्थी निवड जिल्हा निवड समितीने करायची आहे. त्याकरीता पशुसंवर्धन अधिकाऱ्याने योजनेस सर्व प्रकारच्या प्रसिध्दी माध्यमाव्दारे व्यापक प्रसिध्दी देवून लाभार्थ्याकडून अर्ज मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे अभिलेख नस्तीमध्ये आढळुन आलेला नाही. तसेच एकुण प्राप्त अर्ज आवक केल्याचे आढळुन आले नाही. पंचायत समितीस प्राप्त अर्ज किती त्यापैकी पात्र किती लाभार्थी अर्ज जिल्हा स्तरावरील समितीकडे पाठविण्यात आली. तसेच जिल्हा निवड समितीने पात्र अपात्र ठरविलेल्या लाभार्थ्यांची यादी त्रृटीसह व छाननी तपशिलासह व अभिलेख आढळुन आला नाही.

2) योजनेतील मार्गदर्शक सूचना क्रमांक 4 नुसार शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2011/प्र.क्र.414/पदुम-4, दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थ्यांना या योजने अंतर्गत लाभ देण्यात यावा, अशी सूचना असतांना विकलांग लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला नाही.

3) शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 7 नुसार जिल्हा स्तरावर लाभार्थी निवड समितीने निवड केलेल्या लाभार्थ्यांची यादी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परीषद यांच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन

देण्यात यावी व तसे लाभार्थ्यांना कळविणे आवश्यक असतांना जिल्हा स्तरावरुन तशी कार्यवाही झाल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

4) या योजनेमध्ये मार्गदर्शक सूचना क्रमांक 11 मध्ये नमूद केलेल्या जातीच्या गाई किंवा म्हैशी 10 ते 12 व 8 ते 10 लिटर प्रती दिन दुध देणाऱ्या गायी किंवा म्हैशी दुसऱ्या /तिसऱ्या वेतातील 15 ते 30 दिवसांपूर्वी व्यायलेल्या संकरीत गायी /म्हैशीचे वाटप करणे आवश्यक असतांना तशा प्रकारची कार्यवाही केली नाही.

5) तसेच खरेदी समितीने दुधाळ जनावरांच्या किंमती बाबत कुठलाही वाटाघाटी करुन दर निश्चित केलेले असल्याबाबतचा नोंद नाही.

6) लाभार्थ्याचे अर्ज आवक करण्यात आले नाही. तसेच दारिद्रय रेषेखालील कुंटुबाचे प्रमाणपत्र सन 2002-2003 चे सव्हेनुसार असल्याचे आढळुन आले आहे.

7) श्री. काशिनाथ खंदारे यांचया अर्जावर दिनांक नाही व साक्षीदाराच्या सहया नाहीत. तसेच श्री. ज्ञानबा तायडे दुधाळा जनावर खरेदी दिनांक 28/07/2016 ला करण्यात आले आहे व त्याच्याकडुन करारनामा दिनांक 31/01/2017 ला घेण्यात आला आहे. याबाबत योग्य तो खुलासा करावा.

8) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक प्र.क्र.305, दिनांक 22/11/2011 मधील ठरवुन दिलेल्या आर्थिक निकसानुसार 5.75 टक्के +10.03 टक्के सेवादर या दराने तीन वर्षाचा विमा काढणे आवश्यक असतांना एक वर्ष कालावधीचा विमा काढण्यात आला आहे. उदाहरणा दाखल श्री. उध्वव सदाशिव लढाड विमा कालावधी दिनांक 25/04/2017 ते 24/04/2017

9) या योजने अंतर्गत खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची महाराष्ट्र ॲनिमल आयडेंटिफिकेशन अँड रेकॉर्डींग ॲथॉरिटी यांचेकडे नोंदणी करणे बंधनकारक असतांना त्यानुसार नोंदणी केल्याचे अभिलेखे दर्शविले नाहीत.

10) मार्गदर्शक सूचना क्रमांक 20 नुसार पशुधन विकास अधिकारी (विस्तार) व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद यांनी विहीत टक्केवारीनुसार पुरवठा केलेल्या दुधाळ जनावराची प्रत्यक्ष पडताळणी करुन तसा अहवाल वरिष्ठास सादर केल्याचे अहवाल तपासणीस उपलब्ध केले नाहीत.

11) मार्गदर्शक सूचना क्रमांक 27 नुसार दुधाळ जनावरांचे पालन करण्यासाठी पुरेशी जागाअसल्याबाबत व मार्गदर्शक सूचना क्रमांक 28 नुसार लाभार्थ्याने दुग्ध व्यवसाय/ गाय-म्हैस पालन विषयक प्रशिक्षण घेतल्याचे अभिलेखे नस्तीत उपलब्ध झाले नाहीत.

12) लाभार्थी अर्जावरील हमीपत्रानुसार दुधाळ जनावर मी तीन वर्ष विकणार नाही त्यापासुन दुग्धव्यवसाय करेल, जर तीन वर्षापुर्वी विकले, तर पशु संवर्धन विभागाच्या कोणत्याही योजनेचा लाभ मला मिळणार नाही. मात्र याप्रमाणे पाहणी केलेली असल्याबाबतचा अहवाल नाही. सबब योजनेची फलश्रुतीबाबतचे अभिलेखे सबंधीत नस्तीत उपलब्ध झाले नाहीत. फलश्रुतीबाबत अभिलेख्यासह सत्यता पटवावी.

**4.476 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावर गटवाटप खर्चातील अनियमितता**

**पंचायत समिती मारेगांव, जिल्हा यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,60,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो 2011/प्र.क्र. 305/पदम 4, दिनांक 22/11/2011 चे मार्गदर्शक सुचना बाब क्रमांक 1, 10, 11, 15, 19, 20, 21, 27 नुसार कार्यवाही करण्यांत आल्याबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

2) उपरोक्त शासन निर्णय दिनांक 22/11/2011 अन्वये लाभार्थ्यांकडे पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही. गौण उपलब्ध असल्याबाबत प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही.

3) उपरोक्त नमुद शासन निर्णयामधील बाब क्रमांक 4 अन्वये 3 टक्के विकलांग लाभार्थ्याना या योजनेतंर्गत लाभ देणे आवश्यक असतांना तशा प्रकारची कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

4) उपरोक्त नमुद शासन निर्णयामध्ये नमूद लाभार्थी निवडीचे निकषाप्रमाणे सुशिक्षीत बेरोजगार व महिला बचत गटातील लाभार्थी यांना लाभ देण्यांत आलेला नाही.

5) उक्त शासन निर्णय बाब क्रमांक 15 अन्वये या योजने अंतर्गत खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची नोंद महाराष्ट्र ॲनिमल आयडेंटिफीकेशन ॲन्ड रेकॉर्डीक ॲथॉरिटी यांचेकडे नोंदणी केलीबाबत आढळले नाही.

6) उक्त शासन निर्णय बाब क्रमांक 25 व 30 अन्वये लाभार्थ्यांने मिळालेल्या लाभाचा गैरवापर करु नये, याकरीता विहित नमुन्यातील बंधपत्र करुन घेणे आवश्यक असतांना तशा प्रकारे कार्यवाही करण्यात आली नाही.

7) शासन परिपत्रक क्रमांक परांस 1095/ प्र.क्र.73/34, दिनांक 20/11/1999 नुसार प्रपत्र अ मध्ये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु, लेखापरीक्षणास मास्टर नोंदवही सादर न केल्यामुळे दुबार लाभ झाल्याच्या दृष्टीने पडताळणी करता आली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008 /प्र.क्र.446/वित्त दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्ट इ नुसार जिल्हा परीषदामधील वैयक्तीक लाभाच्या योजना दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविणे आवश्यक असतांना तशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही.

**4.477 दूभत्या जनावरांसाठी खादय उपलब्धतेसाठी 100 टक्के अनुदानावर वैरण बियाणे/थोंबे पुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती नागपूर, जिल्हा नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समितीने 2016-2017 मध्ये दूभत्या जनावरांसाठी खादय उपलब्धतेसाठी 100 टक्के अनुदानावर वैरण बियाणे/थोंबे पुरवठा करणेकरीता प्रमाणक क्रमांक 1130 दिनांक 04/02/2017 अन्वये रक्कम रुपये 39,960/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) महाराष्ट्र शासन, कषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2010/प्र.क्र.340/पदुम-4, दिनांक 30/08/2010 मार्गदर्शक सूचना क्रमांक 03 अन्वये प्रती लाभार्थी रूपये 600/- च्या मर्यादेत वैरण बियाणांचा पुरवठा करावयाचा आहे, असे असताना प्रती लाभार्थी रूपये 600/- च्या मर्यादेत वैरण बियाणे वाटप न करता रूपये 2,328/- चा जादा पुरवठा केलेला असून रक्कम रूपये 2,328/- वसुलपात्र ठरते.

2) एकाच कुटुंबातील जादा व्यक्तींना लाभ दिल्याबाबत पशुवैद्यकीय दवाखाना, बूटिबोरी अंतर्गत लाभार्थ्यांचे अर्ज तपासले असता, श्री. विठठल लक्ष्मण सयाम व इतर चारही लाभार्थींचा जमिनीचा सातबारातील भूमापन क्रमांक 88 एकच आहे. म्हणजेच पाचही लाभार्थी एकाच कुटूंबातील सदस्य आहेत. उपरोक्त शासन निर्णयानुसार एका कुटूंबातील एकाच लाभार्थ्याला लाभ दयायचा आहे. सबब नंतरचे 04 लाभार्थींना एकूण 20kg वैरण बियाणे वाटपाची रक्कम रूपये 1,440/- वसुलपात्र ठरते.

तसेच जयराम आनंदराव कौरातेव इतर चार लाभार्थींचा सातबारा एकच असल्यामुळे पाचही लाभार्थी एकाच कुटूंबातील सदस्य आहेत. सबब वरील पाचही लाभार्थींना एकूण 30kg रूपये 2,160/- वैरण बियाण्यांचा पुरवठा केलेला असून त्यापैकी जादा प्रदान रूपये 1,560/- लेखा मान्य करता येत नाही व रक्कम वसुलपात्र ठरते.

3) पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-2, धामणा अंतर्गत एकूण 05 लाभार्थींना लाभ दिलेला आहे. त्यापैकी चार लाभार्थ्यांचे अर्ज नसून सुरूवातीचे चार लाभार्थी त्यांचा नावावरून एकाच कुटूंबातील सदस्य आहेत, हे स्पष्ट होते. सबब शेवटचे चार लाभार्थ्यांची वैरण बियाण्यांची रक्कम परीगणित करून वसुल करावी

4) तपासणी अहवाल- दरकरारातील अट क्रमांक 13 अन्वये शासन निर्णय दिनांक 05/03/2010 नुसार पशुखादय भारतीय मानक संस्था (BSI) निर्देशीत प्रमाणक दर्जा नुसार पुरवठा केल्याबाबत तपासणी अहवाल नस्तीबध्द नाही.

5) योजनेचे मुल्यमापन व फलश्रुती अहवालाबाबत- महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक परास-1089/646/266/34 दिनांक 29/07/1989 अन्वये राबविलेल्या योजनेचे विभाग प्रमुखांनी मुल्यमापन करून फलश्रुती अहवाल नियमातील नमुन्यात सादर केलेला नाही.

**4.478 मागासवर्गीय शेतकऱ्यांना 75% अनुदानावर दुधाळ जनावरे गट वाटप योजनेतील अनियमितता**

**पंचायत समिती सावनेर, जिल्हा नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समितीने 2016-2017 मध्ये मागासवर्गीय शेतकऱ्यांना 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे गट वाटप योजने अंतर्गत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 5,74,164/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अनुदान मंजूरी आदेशातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 03 नुसार लाभांर्थी निवडतांना 3 टक्के लाभार्थी विकलांग प्रवर्गातील असावेत. तथापि, वरील लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यामध्ये विकलांग प्रवर्गातील लाभार्थी दिसून येत नाही.

2) मार्गदर्शक सुचना क्रंमांक 13 नुसार लाभार्थ्यांनी दुभत्या जनावरांचे पालन/संगोपनाचे प्रशिक्षण घेतले नसल्यास 1 दिवसाचे निशुल्कं प्रशिक्षण देणेबाबत तरतुद आहे. तथापि, 07 लाभार्थ्यांच्या प्रशिक्षणाबाबतचे अभिलेखे नस्तीला उपलब्धं नाही.

3) मार्गदर्शक सुचना क्रमांक 02 नुसार निवड यादीतील क्रमानुसार लाभ देणे आवश्यक असतांना लाभार्थी मंजूर यादीतील श्री.नितीन भगवान खांडेकर यांना प्रथम लाभ देणे आवश्यक असतांना त्याऐवजी प्रतिक्षा यादीतील श्रीमती वर्षा गौतम झोडापे यांना लाभ देण्यात आल्याचे दिसून येते. श्री.नितिन भगवान खांडेकर यांचे लाभ घेण्यात असमर्थ असल्याबाबतचे पत्र नस्तीला आढळून आले नाही.

**4.479 अनुसुचित जातीच्या व नवबौध्द लाभार्थीना पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण देणेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सावनेर, जिल्हा नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत पंचायत समिती सावनेरने सन 2016-2017 मध्ये 2 प्रमाणकांन्वये रक्कम रूपये 80,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीची तपासणी केले असता नस्तीमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या ठिकाणाचे नांव आढळून आले नाही.

2) लाभार्थींची निवड बाबत प्रसिध्दी देऊन लाभार्थी निवड अर्ज बोलावणे आवशयक असतांना प्रसिध्दीबाबत नस्ती, वर्तमानपत्राचे कात्रण इत्यादी नस्तीबध्द नाही.

3) पशुसंवर्धन आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे पत्र क्रमांक 1591-2665, दिनांक 24/06/2015 प्रमाणे लाभार्थींची निवड नमुद समितीने केल्याबाबत व नमुद निर्देशानुसार योजना राबविल्याची नस्ती नस्तीबध्द नाही.

4) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, नागपूर यानी पत्र क्रमांक 106, दिनांक 10/07/2017 अन्वये यादीला मंजूर प्राप्त असतांना प्रशिक्षणाचा दिनांक 8, 9, व 10/2/2017 ला नियमबाहयरित्या घेण्यात आले आहे.

5) एकूण 80 लाभार्थी यादीमधील एकूण 29 लाभार्थी उपस्थीत नसल्याचे दिसून येत आहे.

6) आयोजित शेतक-यांची सहल कोच्छी / टेभूरडोह येथे दिनांक 09/02/2017 ला दोन प्रवास गाडीने पोहचून व आणून दिलेबाबत व एकूण खर्च रूपये 15,200/- नोंदविला आहे. दरपत्रके बोलाविली नाही. सदर बाबीवर तरतूद रूपये 8,000/- असतांना रूपये 7,200/- चा जादा खर्च नोदविला आहे.

7) खरेदी केलेल्या स्टेशनरी साहित्याचे दरपत्रके बोलावले नाही.

8) मदन भाऊ फूलवाले यांचे देयक क्रमांक 1406, दिनांक 10/02/2017 रूपये 700/- व 1407 दिनांक 08/02/2017 हे एकाच बिल बुकातील असतांना दिनांक आपल्या सोईनुसार नोंदविल्याचे दिसून येते तारखेत अनियमितता दिसून येते.

**4.480 पशु वैदयकीय संस्थांना औषधी पुरवठा करणेबाबत**

**पंचायत समिती देवरी, जिल्हा गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत पशु वैदयकींय संस्थांना औषधांचा पुरवठा करण्याकरिता औषधी खरेदी करण्यात आलेली आहे. सदर औषधी खरेदी करण्यसाठी मे.शिवम मेडीकल एजन्सी, गोदिंया यांना पुरवठा आदेश

क्रमांक पविअ/पंसदे/92/विषय 16, दिनांक 24/09/2016 अन्वये औषधी खरेदी करण्याबाबत पुरवठा आदेश मंजुर दरानुसार देण्यात आले. पंरतू सदर उपप्रमाणकाची मंजुर दरानुसार खात्री केली असता बील क्रमांक 1955 दिनांक 19/11/2016 अन्वये रुपये 1,01,999/- ची औषधांची खरेदी ही मंजुर दरपत्रकानुसार दिसुन येते मात्र बिलातील औषधे ही पुरवठा आदेशानुसार नाहीत. त्यामुळे सदर औषधी ही मागणी नसतांना खरेदी केल्याचे स्पष्ट दिसुन येते. तसेच सदर खरेदी केलेल्या औषधांची नोंद साठा पुस्तकात सुध्दा घेण्यात आल्याची दिसुन आले नाही औषधांचा पुरवठा सुध्दा संस्थांना केल्याचे दिसुन येत नाही तरी अनावश्यक खरेदी बाबत रककम रुपये 1,01,999/- तरी रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

**4.481 एकात्मीक कुक्कुट विकास योजना अंतर्गत 100टक्के अनुदानावर एक दिवसीय चीक वाटप योजना**

**पंचायत समिती सडक अर्जुनी, जिल्हा गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,19,950/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्याची निवड कशाच्या आधारावर केली त्याचे अभिलेखे नस्तीला उपलब्ध नाहीत.

2) सदर योजनेच्या लाभधारकाला पिले प्राप्त होण्याआधीच लाभार्थ्याकडून चीक मॅस रेशन घेतले असल्याबाबत देयके घेणे आवश्यक असताना काही लाभधारकांचे कुक्कुट रेशन उपप्रमाणक तपासले असता उपप्रमाणक क्रमांक - 120 दिनांक 24/01/2017 एका किराणा दुकानाचा आढळला - कुक्कुट पिले प्राप्त झाल्यानंतर 42 दिवसानंतर घेतल्याचे आढळले. त्यामुळे पिलांना योग्य वेळी व योग्य खाद्य न मिळाल्याचे दिसते.

3) कुक्कुट जिवंत/मृत अहवाल उपलब्ध नाही

4) योजनेचा उद्देश आर्थिक उन्नतीस मदत आहे. तेव्हा संबंधीतास लाभधारकाच्या आर्थिक उन्नतीस लाभ झालेला आहे. असे संबंधीत प्राधिकरणाचे फलश्रुती अहवाल नाही

**4.482 SCP योजने अंतर्गत 100% अनुदानावर बैलजोडी अनुदान वाटपाबाबत.**

**पंचायत समिती चिमुर, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 38) -** सदरबाबत रक्कम रूपये 41,94,000 /- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बैलजोडी यांचा पुरवठा लाभार्थ्यांच्या संमतीनुसार, पशुवैदयकिय अधिकारी, जिल्हा कृषि अधिकारी (विघयो), जिल्हा परिषद व कृषि अधिकारी (विघयो) यांच्या उपस्थितीत करावी. बैलजोडी सदृढ व शेती कामात योग्य् असल्याबाबत पशुवैदयकिय अधिका-यांकडुन प्रमाणपत्र घेण्यात यावे. खरेदीचा व्यवहार झाल्यानंतर बैलजोडीचा विमा उतरविण्यात यावा व निशाणी म्हणून टॅटुईग करुन (गोंदवुन) घ्यावे. तसेच लाभार्थीचा बैलजोडी समवेत पोस्टकार्ड साईजचा फोटो काढावा. सदर बाबतचे दस्ताऐवज नस्तीत आढळुन आले नाही. याबाबत संबंधित विभागाला अर्धसमास पत्र क्रमांक 04 दिनांक 06/09/2017 अन्वये विचारणा केली असता अर्धसमासाची मुळ प्रत खुलास्यासह परत करण्यात आली नाही.

2) बैलजोडी अनुदानाची मर्यादा रूपये 30,000/- असल्यामुळे सर्व लाभार्थींना रुपये 30,000/- प्रमाणे खरेदी करुन दिल्याचे निदर्शनास येते. वास्तविक सर्व बैलजोडया सारख्या नसतांना जोडयांची किंमत रुपये 30,000/- दर्शवून शासन अनुदान खर्ची टाकल्याचे लेखापरीक्षणात आढळून येते.

3) शासन निर्णय क्रमांक आऊयो 2415/प्र.क्र.217/4अे, दिनांक 05/06/2015 चे परिशिष्ट तीन मधील मुददा क्रमांक (दहा) नुसार लाभार्थ्यांना देण्यात येणा-या बाबवार अर्थसहाय्याची योजनानिहाय, बाबनिहाय व लाभार्थी निहाय नोंद करण्याकरिता पंचायत समिती स्तरावर रजिस्टर् ठेवण्यात यावे व त्यामध्ये लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या अनुदानाची बाबनिहाय नोंद ठेवण्यात यावी. पंचायत समिती स्तरावरील नोंदवही व अभिलेख जिल्हा कृषि अधिकारी (विघयो) यांनी तपासुन तशी नोंद नोदंवहीमध्ये घेण्यात यावी. लाभार्थ्यांना दिलेल्या अर्थसहायाची लाभार्थी स्तरावर नोंद ठेवण्यासाठी लाभार्थींना नोंदपुस्तिका देण्यात यावी. या नोंदपुस्तिकेत दिलेल्या अर्थसहाय्याची नोंद संबंधित

अधिका-यांनी वेळोवेळी न चुकता करावी, असे स्पष्ट नमुद असतांना त्याबाबतची नोंदवही लेखापरीक्षणास सादर केली नाही.

4) शासन निर्णय क्रमांक आऊयो 2415/प्र.क्र.217/4अे, दिनांक 05/06/2015 चे परिशिष्ट तीन मधील मुददा क्रमांक (पाच) नुसार उपरोक्त योजनेंर्गत लाभार्थीची निवड करण्यासाठी तालुक्यातील गट विकास अधिकाऱ्याने कृषि अधिकारी (विघयो) यांच्या मार्फत केलेल्या नमुन्यात पात्र लाभार्थ्यांकडुन अर्ज मागवुन घ्यावेत, असे असतांना लाभार्थ्यांचे अर्ज लेखा परीक्षणास सादर केले नाही.

**4.483 75% अनुदानावर विदयुत मोटारपंपाचे वाटप**

**पंचायत समिती भद्रावती, जिल्हा चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रूपये 2,20,500/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश अटी व शर्थी मध्ये नमूद अट क्रमांक 1 पुरवठा आदेश दिल्यापासून पुरवठा 10 दिवसांत करण्यात यावा, असे नमूद आहे व अट क्रमांक 11 मध्ये नमूद विहित मुदततीत पुरवठा न झाल्यास नियमानूसार विलंब शुल्क् आकरण्यात येईल, असे नमूद आहे. प्रत्यक्षात पुरवठा दिनांक 17/03/2017 ला करण्यात आला म्हणजेच 4 महिने उशीराने पुरवठा झालेला असून नियमानूसार विलंब शुल्काची वसूली होणे आवश्यक ठरते परंतू, अशा प्रकारची वसूली केलेली नाही. तेव्हा विलंब शुल्काची परीगणना करुन रक्कम वसूल करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/ 2000/ प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2001 नुसार नियोजन करुन लाभार्थी निवड करणे व ज्या वित्तीय वर्षात योजना राबविली, त्याच वित्तीय वर्षात लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देणे आवश्यक असुन तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/ 1084/ सी.आर.1633/50, दिनांक 18/01/2005 नुसार लाभार्थी हिस्सा त्याच आर्थिक वर्षात वसुल करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारंण विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रावि/पीआरसी 1083/सीआर 1074/578, दिनांक 02/07/1993 मधील सुचनेनुसार उपयोगीता प्रमाणपत्र घेणे व उदिष्ट साध्य झाल्याची खात्री करुन देणे आवश्यक असतांना उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

**4.484 दुभत्या जनावराचे गट वाटपातील अनियमततेबाबत.**

**पंचायत समिती गडचिरोली, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,82,776/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विमा रक्कम प्रती लाभार्थी रक्कम रूपये 5,061/- प्रमाणे 6 लाभार्थीची रक्कम रूपये 30,366/- भरावयाची आहे. परंतू, 6 लाभार्थीची रक्कम रूपये 17,280/- भरल्याचे दिसून आले. रक्कम रूपये 13,086/- कमी भरल्याचे दिसून आले. तसेच जनावरांचा विमा नस्तीला आढळलेला नाही. तरी सुध्दा रुपये 17,280/- भरल्याचे दिसुन येते. तरी 17,280/- रुपये वसुल करावे.

2) योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार (अट क्रंमाक 1) अंमलबजावणी अधिकाऱ्याने या योजनेस व्यापक प्रसिद्धी देऊन अर्ज मागविल्याचे आढळून आले नाही. 6 लाभार्थ्यांपैकी 4 लाभार्थी नगरी याच गावातील आहे. नगरी याच गावातील लाभार्थी निवडीमागचे प्रयोजन लेखापरिक्षणास समजले नाही. म्हणजेच योजनेस व्यापक प्रसिध्दी दिल्याचे आढळत नाही.

3) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2011/प्रं.क्रं.414/पदुम-4, दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत सूचना आहे. परंतू, एकही विकलांग (अपंग) लाभार्थीच निवड केलेली नाही.

4) जनावरे प्राप्त झाल्याबाबत लाभार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. पोच पावत्या नाहीत.

5) लाभार्थीचे विनियोजन प्रमाणपत्र नाही. फलश्रुती अहवाल नाही.

6) मार्गदर्शक सूचना क्रमांक 10 नुसार क्लस्टार स्वरूपात आणि अस्तित्वातील/प्रस्तावित दूध संकलन मार्गावरील गावामधे राबविणेबाबत सूचना आहे. तसे केल्याचे आढळून आले नाही.

7) मार्गदर्शक सूचना क्रमांक 15 नुसार खरेदी केलेल्या दुधाळू जनावराची महाराष्ट्र ॲनिमल आयडेंटिफिकेशन ॲन्ड रेकॉर्डिंग ॲथोरिटी कडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. परंतू, तसे केल्याचे आढळून आले नाही.

**4.485 आदिवासी उपयोजना अंतर्गत शेळी गट वाटप योजने अंतर्गात अनियमितता.**

**पंचायत समिती चामोर्शी, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** आदिवासी उपयोजना अंतर्गत शेळी गट वाटप योजनेकरिता रक्कम रूपये 1,91,404/- खर्च करण्यात आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्राप्त शेळी गटाची (10+1) नोंद साठा पुस्तक पेज क्रमांक 16 वर घेतलेली आहे. परंतू, साठापुस्तक विहीत नमुना फार्म क्रमांक 35 मध्ये नाही व शेळी गटाचे वाटपावर लाभार्थीची स्वाक्षरी नाही.

2) योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार 3 टक्के विकलांग लाभार्थीची निवड आवश्यक आहे. परंतू, एकही विकलांग लाभार्थीची निवड केलेली नाही.

3) लाभार्थीकडून विनियोजन प्रमाणपत्र व फलश्रुती अहवाल प्राप्त केल्याचे आढळून आले नाही.

4) लेखा संहिता 1968 चे कलम 20 व 21 नुसार पुरवठा दाराच्या पोचपावत्या आढळून आल्या नाही

5) विमा रक्कम मार्गदर्शक सूचना नुसार प्र्ती गट रक्कम रुपये 2,848 x 4 = 11,392/- प्रमाणे देय असतांना रक्कम रुपये 2,851 x 4 = 10,404/- प्रमाणे पावती दिनांक 31/05/2017 अन्वये जमा केली आहे. विमा रक्कम कमीबाबत शुद्धिपत्रक आढळून आले नाही.

**4.486 आदिवासी उपयोजना अंतर्गत लाभार्थ्यांना 75 टक्के अनुदानावर शेळीगट वाटपातील अनियमितता**

**पंचायत समिती एटापल्ली, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** सदर योजना राबविण्यांकरिता रक्कम रूपये 4,30,632/- इतके अनुदान प्राप्त झाले असून रूपये 3,21,300/- इतकीच रक्कम खर्च झालेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 चे मार्गदर्शक सुचना क्रमांक 5 नुसार योजने अंतर्गत 3 टक्के विकलांग लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक असतांना एकाही विकलांग लाभार्थ्याला लाभ देण्यांत आल्याचे आढळले नाही.

2) पशुधन विकास अधिकारी(विस्तार), पंचायत समिती यांनी 25 टक्के प्रत्यक्ष तपासणी व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी 10 टक्के प्रत्यक्ष तपासणी केल्याचे अभिलेखे आढळून आले नाही.

3) सन 2014-2015 चे मार्गदर्शक सुचनेनुसार लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची माहीती संबंधित ग्रामपंचायतीस कळविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अभिलेख्यांत आढळले नाही.

4) 9 लाभार्थ्यांकडून स्वाक्षरीसह उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असतांना ते घेण्यांत आल्याचे अभिलेख्यांत आढळले नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक सुकृऔ-2016/प्र.क्र.301/11-अ, दिनांक 21/01/2017 नुसार लाभार्थ्याला अनुदानाची रक्कम त्याचे बँक खाते आधार क्रमाकांशी जोडून घेणे आवश्यक असून रक्कम बँक खात्यांत जमा करण्यांचे आदेशानुसार धनादेशाद्वारे रक्कम बँक खात्यांत जमा करण्यांत आले आहे. परंतु, लाभार्थ्याला अनुदान प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षरीसह पोहोच पावती किंवा बँकेत अनुदानाची रक्कम जमा झाल्याबाबत बँक पास बुकची झेरॉक्स प्रत सादर करण्यांत आलेले नाही

6) समितीने निवड केलेल्या 12 लाभार्थ्यांपैकी फक्त्त 9 लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यांत आलेला आहे. परंतु, 3 लाभार्थ्यांना लाभ न मिळाल्यामुळे ते गरजु लाभार्थी लाभापासून वंचीत राहीले आहेत.

**4.487 अनुसूचीत जातीच्या लाभार्थ्यांना 75 टक्के अनुदानावर दुधाळू जनावरांचे गट वाटप कामातील अनियमितता**

**पंचायत समिती अहेरी, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** अनुसूचीत जातीच्या लाभार्थ्यांना 75 टक्के अनुदानावर दुधाळू जनावरांचे गट वाटप कामावर एकूण रक्कम रूपये 5,74,164/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलपमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक/जिवायो-2011/प्र.क्र. 305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील अट क्रमांक 13 नुसार दुभत्या जनावरांची खरेदी शक्यतो राज्याबाहेरील नामाकिंत पशुच्या बाजारातुन करावी, असे असतांना सदर योजनेकरिता दुधाळू जनावरांची खरेदी दिनांक 05/03/2017 ला कृषी उत्पन्न बाजार समिती, ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर येथील बाजारातुन खरेदी करण्यांत आल्याने अटी/शर्तीचे पालन झाले नाही.

2) खात्याचे पत्र क्रमांक एफ वाय पी-12/(13)/सी.आर-1076/2013/पंस-6,पुणे-01, दिनांक 15/09/2014 आणि दिनांक 20/02/2015 अन्वये तसेच महाराष्ट्र शासन आदेश दिनांक 28/02/2003 नुसार योजनामध्ये 33 टक्के महिला लाभार्थी असणे आवश्यक असतांना सदर योजनेत दोन महिला लाभार्थींना लाभ देणे आवश्यक असतांना एकाही महिलेला लाभ दिल्याचे आढळून आले नाही.

3) पशुधन विकास अधिकारी(विस्तार), पंचायत समिती यांनी 25 टक्के प्रत्यक्ष तपासणी व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी 10 टक्के प्रत्यक्ष तपासणी केल्याचे अभिलेखे आढळून आले नाही.

4) विशेष घटक योजने अंतर्गत दरवर्षी लाभार्थ्यांना लाभ देण्यांत येतो. परंतु, लाभ देण्यांत आलेल्या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला दुबार लाभ न दिल्याची खात्री करता आले नाही.

5) सन 2014-2015 चे मार्गदर्शक सुचनेनुसार लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची माहीती संबंधित ग्रामपंचायतीस कळविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अभिलेख्यांत आढळले नाही.

**4.488 शेळी गट वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मूलचेरा, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** आदिवासी उपयोजना अंतर्गत 75 टक्के अनुदानावर शेळी गट वाटप करण्याकरीता रक्कम रूपये 1,07,658/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो 2011/प्रक्र./323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 14 नुसार लाभार्थीने शेळी मेंढीपालन विषयक प्रशिक्षण घेतले नसतांना सदर योजनेतुन लाभ दिल्यामुळे शासन निर्णयातील सुचना क्रमांक 14 चे पालन केलेले नाही.

2) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे पत्र 309-320/2017, दिनांक 08/03/2017 अन्वये 3 लाभार्थ्यांची निवड केलेली आहे. परंतु, पशुसंवर्धन विभागाची मास्टर नोंदवही सादर केलेली नाही. त्यामुळे शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 मधील लाभार्थी निवडीचे निकषाचे व मार्गदर्शन सूचनेचे पालन केले किंवा कसे? याबाबत खात्री करता आली नाही.

3) ज्यांचेकडून शेळी गट खरेदी केलेली आहे. परंतू, शेळी गटाची रक्कम प्राप्त झाल्याबद्दल लेखा संहिता नियम 20 व 21 नुसार कोणत्याही विक्रेत्यांची मुद्रांक पावती आढळून आली नाही.

4) लेखा संहिता 1968 नियम 93 नुसार पशुधन रजिस्टर नमुना-35 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. परंतू, साठा रजिस्टर लेखापरीक्षणास सादर झाले नाही.

5) लाभार्थ्यांचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर झाले नाही.

**4.489 दुभत्या जनावराचे गट वाटपातील अनियमततेबाबत.**

**पंचायत समिती मूलचेरा, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** विशेष घटक योजना अंतर्गत थेट लाभांथर हस्तांतर योजनेदवारे 75 टक्के अनुदानावर दुधाळू जनावरे वाटप करण्याबाबत रक्कम रूपये 2,55,184/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो-2011/ प्र.क्रं.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 13 नुसार दुभत्या जनावरांची खरेदी शक्यतो राज्य बाहेरील नामांकींत पशुच्या बाजारातुन करण्यात यावी, अशी अट असतांना त्याप्रमाणे खरेदीची प्रकीया केलेली नाही.

2) सदर योजनेअंतर्गत पुरवठा केलेल्या दुधाळ जनावरांची महाराष्ट्र ॲनिमल आयडींटीफीकेशन ॲन्ड रेकॉडिंग अथॉरिटी यांचेकडे नोंदणी करणे बंधनकारक असतांना तशी नोंदणी विभागाने केलेली नाही

3) सदर योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या जनावरांचे वाटप प्रथमत: एका जनावराचे वाटप करावे व सहा महिन्यांनंतर किंवा दिलेले दुधाळ जनावर आटल्यानंतर (यामधील जो कालावधी कमी असेल तो) दुसरे जनावर वाटप करावे, अशी अट असतांना सुध्दा त्यांचे पालन न करता एकाच वेळी दोन दुधाळ जनावर वाटप केल्यामुळे शासन अटीचे उल्लघंन झालेले आहे.

4) पशुधन विकास अधिकारी यांनी 25 टक्के प्रत्यक्ष तपासणी व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी 10 टक्के तपासणी केल्याचे आढळले नाही. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रंमाक 1083/1074, दिनांक 09/01/1983 नुसार राबविण्यात येणारी योजना सफल झाल्याबाबत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी तपासनी करणे आवश्यक असतांना तशी तपासणी केल्याचे तपासणी अहवाल लेखापरीक्षणास सादर केले नाही.

5) सदर योजनेचे फलश्रुती व मुल्यमापन अहवाल सादर केले नाही.

**4.490 75 टक्के अनूदानावर लाभार्थ्यांना दूधाळू जनावरे गट वाटपाबाबत**

**पंचायत समिती देसाईगंज वडसा, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 33) -** 75 टक्के अनूदानावर लाभार्थ्यांना दूधाळू जनावरे गट वाटपाबाबत रक्कम रूपये 2,51,520/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक/जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील अट क्रमांक 13 नुसार दुभत्या जनावरांची खरेदी शक्यतो राज्याबाहेरील नामाकिंत पशुच्या बाजारातुन करावी, असे असतांना सदर योजनेकरिता दुधाळू जनावरांची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समिती, ब्रम्हपुरी, जिल्हा-चंद्रपूर येथील बाजारातुन खरेदी करण्यांत आल्याने अटी/शर्तीचे पालन झाले नाही.

2) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक 1083/1074 दिनांक 09/01/1983 नूसार राबविण्यात येणारी योजना सफल झाल्याबाबत जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परीषद, गडचिरोली. यांनी तपासणी करणे आवश्यक असतांना तशी तपासणी केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2011/प्र.क्र. 414/पदुम - 4, दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात यावे, असे नमुद असतांना त्याप्रमाणे पुर्णत कार्यवाही करण्यात आली नाही.

4) शासन निर्णय दिनांक 22/11/2011 नुसार या योजने अंतर्गत खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची महाराष्ट्र ॲनिमल आयडेटिफिकेशन ॲन्ड रेकॉ र्डिंग ॲथॉरिटी यांचेकडे नोंदणी करणे बंधनकारक राहील

5) सन 2014-2015 चे मार्गदर्शक सुचनेनुसार लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची माहीती संबंधित ग्रामपंचायतीस कळविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अभिलेख्यांत आढळले नाही.

**4.491 75 टक्के अनूदानावर लाभार्थ्यांना दूधाळू जनावरे गट वाटपाबाबत**

**पंचायत समिती भामरागड, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** 75 टक्के अनूदानावर लाभार्थ्यांना दूधाळू जनावरे गट वाटपयोजनेवर रक्कम रूपये 5,74,164/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक/जिवायो-2011/प्र.क्र. 305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील अट क्रमांक 13 नुसार दुभत्या जनावरांची खरेदी शक्यतो राज्याबाहेरील नामांकित पशुच्या बाजारातुन करावी, असे असतांना सदर योजनेकरिता दुधाळू जनावरांची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समिती, लाखांदूर, जिल्हा भंडारा येथील बाजारातुन खरेदी करण्यांत आल्याने अटी/शर्तीचे पालन झाले नाही.

2) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक 1083/1074 दिनांक 09/01/1983 नूसार राबविण्यात येणारी योजना सफल झाल्याबाबत जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी, जिल्हा परीषद, गडचिरोली यांनी तपासणी करने आवश्यक असतांना तशी तपासणी केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2011/प्र.क्र. 414/पदुम - 4, दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात यावे, असे नमुद असतांना त्याप्रमाणे पुर्णत कार्यवाही करण्यात आली नाही.

4) शासन निर्णय दिनांक 22/11/2011 नुसार या योजने अंतर्गत खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची महाराष्ट्र ॲनिमल आयडेटिफिकेशन ॲन्ड रेकॉ डिंग ॲथॉरिटी यांचेकडे नोंदणी करणे बंधनकारक राहील

5) सन 2014-2015 चे मार्गदर्शक सुचनेनुसार लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची माहिती संबंधित ग्रामपंचायतीस कळविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

**4.492 विशेष घटक योजनांतर्गत 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे वाटपातील अनियमितताबाबत**

**पंचायत समिती पैठण, जिल्हा औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती पैठणचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात प्रमाणक क्रमांक 41 दिनांक 04/03/2017 अन्वये रक्कम रुपये 2,20,080/- सात लाभार्थ्यांसाठी प्रत्येकी दोन दुधाळ जनावरे (गाय/म्हैस) खरेदीसाठी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे नावे रक्कम आहरण करुन गाय/म्हैस खरेदीसाठी प्रदान केल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र. 305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 प्रमाणे लाभार्थी निवड समिती गठीत करुन व योग्य ते निकष लावुनच लाभार्थी निवड करणे आवश्यक आहेत. तथापि, अशी कार्यवाही केल्याबाबत दिसुन आले नाही. लेखापरीक्षणात सदरील योजनेबाबत सदर संचीका तपासली असता त्यात जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी कळवलेल्या / निवड केलेल्या लाभार्थी निवड यादीतील नावाप्रमाणे सात लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला आहे. त्यामुळे निवडलेले लाभार्थी योग्य निकष लावुनच निवडल्याबाबत खात्री करता आली नाही.

2) सदरील योजनेचा लाभ घेण्यासाठी सात लाभार्थ्यांनी लाभार्थी हिस्सा ब ठेवी या लेखाशिर्षात भरणा केल्याची चलने सदर संचीकेत दिसुन आली. तथापि, उक्त खरेदीसाठी पुर्ण रक्कम आहरण करताना सरळ लेखाशिर्षातर्गत खर्च नोंदवला आहे. तसेच लेखापरीक्षणात ठेव नोंदवही दर्शवली नाही. त्यामुळे जमेची खात्री करता आली नाही. तरी याबाबत खुलासा होणे व ठेव नोंदवहीत नोंद दर्शवणे आवश्यक आहे.

3) सदरील योजनेअंतर्गत दुधाळ जनावरे खरेदी करताना संबंधीत विक्रेत्यास रोखीने अदाई केल्याचे दिसुन आले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 29(4) नुसार रुपये 1,000/- रुपयाहून अधिक रक्कम द्यावयाचे असेल, तर ती रेखीत धनादेशाव्दारे घेणाऱ्याच्या खाती जमा करणे आवश्यक आहे. परंतू, प्रस्तुत प्रकरणी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे नावे धनादेश देण्यात येऊन विक्रेत्यास खरेदीची

किंमत रोखीने अदाई करुपयेन नियमबाहयता करण्यात आली आहे. या नियमबाहयतेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) उक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 12 प्रमाणे खरेदी समिती गठीत करणे आवश्यक असताना संचीकेतील खरेदीच्या प्रमाणपत्रावर केवळ पशुधन विकास अधिकारी (विस्तार), विमा प्रतिनीधी व लाभार्थी यांच्याच सहया आढळुन आल्या आहेत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

5) सदरील योजनेच्या मार्गदर्शक सुचना क्रमांक 20 प्रमाणे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांच्या 25 टक्के जनावराची प्रत्यक्ष पडताळणी करावी. तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी 10 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करुन तसा अहवाल वरिष्ठास सादर करणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

**4.493 विशेष घटक योजना अंतर्गत दुधाळ जनावरे वाटपातील अनियमितता व जादा प्रदानाबाबत**

**पंचायत समिती पाथरी, जिल्हा परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, पाथरीचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात विशेष घटक योजना अंतर्गत दुधाळ जनावरे खरेदी करण्यासाठी सन 2015-2016 मध्ये प्रमाणक क्रमांक 82 माहे 03/16 अन्वये दिलेला अग्रीम रूपये 3,18,980/- (सन 2016-2017 मध्ये प्रमाणक क्रमांक 137 माहे 03/17 अन्वये समायोजन) व प्रमाणक क्रमांक 09 माहे 02/17 अन्वये ब ठेवी अंतर्गत ठेवलेला लाभार्थी हिस्सा रूपये 1,06,325/- असे एकुण पाच लाभार्थ्यांचे दुधाळ जनावरांच्या गट खरेदीसाठी एकुण रक्कम रूपये 4,25,305/- पशुधनविकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, पाथरीच्या नावे देण्यात आल्याचे दिसुन आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 प्रमाणे लाभार्थी निवड समिती गठीत करुन व योग्य ते निकष लावुनच लाभार्थी निवड करणे आवश्यक आहेत. तथापि, अशी कार्यवाही केल्याबाबत दिसुन आले नाही. लेखापरीक्षणात सदरील योजनेबाबत सादर संचिका तपासली असता, त्यात निवड केलेल्या लाभार्थीची यादीही आढळून आली नाही. त्यामुळे निवडलेले लाभार्थी योग्य निकष लावुनच निवडल्याबाबत खात्री करता आली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 29(4) नुसार रूपये 1,000/- हून अधिक रक्कम द्यावयाचे असेल, तर ती रेखीत धनादेशाव्दारे घेणाऱ्याच्या खाती जमा करणे आवश्यक आहे. परंतू, प्रस्तुत प्रकरणी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे नावे धनादेश/आरटीजीएसद्वारे देण्यात येवून विक्रेत्यास खरेदीची किंमत पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी धनादेशाद्वारे वितरीत केली आली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे:-

3) उक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 12 प्रमाणे खरेदी समिती गठीत करणे आवश्यक असताना संचिकेतील खरेदीच्या प्रमाणपत्रावर केवळ पशुधन विकास अधिकारी (विस्तार), विमा प्रतिनीधी व लाभार्थी यांच्याच सहया आढळुन आल्या आहेत. सहकारी दुध संस्थेचे प्रतिनिधी, कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन पर्यवेक्षक / पशुधन विकास अधिकारी, बँक प्रतिनिधी यांच्या स्वाक्ष-या आढळुन आल्या नाहीत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) सदरील योजनेच्या मार्गदर्शक सुचना क्रमांक 20 प्रमाणे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांच्या 25 टक्के जनावराची प्रत्यक्ष पडताळणी करावी. तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी 10 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करुन तसा अहवाल वरिष्ठांस सादर करणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

5) उक्त योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात प्रत्येक लाभार्थीसाठी एक दुधाळ जनावर खरेदी करुन वाटप करणे आवश्यक आहे व सदरील दुधाळ जनावर आटल्यानंतर दुसया दुधाळ जनावराची खरेदी करुन वाटप करणे आवश्यक असताना प्रस्तुत प्रकरणात श्रीमती गयाबाई कुंडलीक कदम, बोरगव्हाण या लाभार्थ्याच्या दोन्ही दुधाळ जनावरांची

खरेदी एकाच दिवशी म्हणजे दिनांक 08/10/2016 रोजी करुन वाटप केल्याचे दर्शविले आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) सदरील योजना ग्रामीण भागातील लाभार्थ्यांसाठी राबवावयाची असून ग्रामीण भागातील लाभार्थ्यांनाच त्याचा लाभ देय आहे. तथापि, लेखापरीक्षणात सादर संचीकेची तपासणी केली असता, त्यात पाथरी शहरातील श्री.कोंडीबा लिंबाजी कांबळे (आधार क्रमांक 612151263994) यांना लाभ दिल्याचे दिसुन आले आहे. सबब संबंधीत लाभार्थ्यासाठी प्रदान करण्यात आलेली शासन अनुदानाची रक्कम रूपये 63,796/- संबंधीतावर जबाबदारी निश्चीत करुन वसुल करणे आवश्यक आहे.

7) सदरील योजना विशेष घटक योजनांतर्गत अनुसुचीत जाती मधील आर्थिकदृष्टया दुर्बल असणाऱ्या लाभार्थ्यांसाठी आहे. तथापि, सादर संचिकेत श्री.प्रकाश गणपत पवार, अंधापुरी, श्री.विश्वनाथ भगवान कदम, सिमुरगव्हाण, श्रीमती नाबदाबाई महादू भालेराव, रेणाखळी व श्रीमती गयाबाई कुंडलीक कदम, बोरगव्हाण यांची जातीची प्रमाणपत्रे आढळून आली नाहीत.

8) उक्त योजना ज्या उददेशासाठी राबवण्यात आली, तो उददेश सफल झाल्याबाबत योजनेचा फलश्रुती अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

**4.494 कामधेनु दत्तक ग्राम योजने अंतर्गत निवड केलेल्या गावांना केलेल्या खर्चाच्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती हिंगोली, जिल्हा हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** जिल्हा वार्षिक योजनेमधुन कामधेनु दत्तक ग्राम योजना अंतर्गत कार्यक्रमासाठी हिंगोली तालुक्यातील निवड केलेल्या गावासाठी प्राप्त तरतुदीतुन रक्कम रुपये 1,40,000/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 125 नुसार प्रशासकीय मान्यता व नियम 99 नुसार तांत्रीक मान्यताही दर्शविण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 25(2) नुसार रूपये 200/- पेक्षा जादा रकमेचे प्रदान धनादेशाद्वारे करणे आवश्यक असतांना, पेड बाय मी करुन रोखीने अदाई केलेली आहे. तसेच प्रमाणके विरुपित केलेली नाहीत.

3) योजनेची प्रसिध्दी वेगवेगळया माध्यमाद्वारे केल्याचे दिसुन आले नाही. सदर प्रचार प्रसिध्दीचा उददेश ग्रामीण भागातील शेतक-यांना संमेलनातुन चर्चासत्रातुन, दंवडीद्वारे प्रसिध्दी जनजागृती होवुन जास्तीत जास्त प्रसिध्दी शेतक-यांना याजनेची माहिती व्हावी.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 91 नुसार उपरोक्त साहित्याच्या नोंदी साठा नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. साठा नोंदवही ठेवलेली नाही.

5) सहलीच्या खर्चास मान्यता दर्शविली नाही. सहलीत सहभागी झालेल्या शेतक-यांची नावे, उपस्थिती संख्या, उपस्थितीपट, प्रदर्शनाचे फोटो, वृत्तपत्राचे कात्रणे इत्यादी संचिकेत दिसुन आले नाही.

6) कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध्व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय दिनांक 29/10/2010 नुसार योजनेचा सविस्तर फलश्रुती अहवाल खात्यास सादर केल्याचे दिसुन आले नाही योजनेचा लाभ लाभार्थींना झाल्याची खात्री पटवावी.

7) शासन निर्णय क्रमांक नापुयो-2010/प्र.क्रं.-50/पदुम-4, दिनांक 29/10/2010 अन्वये व कामधेनु दत्तक योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार पशुपालक मंडळ स्थापना व नोंदणी करणे आवश्यक आहे व पशुपालक मंडळाच्या सल्याने खर्च करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्घ व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो-2010/प्र.क्रं.340/पदुम-4, दिनांक 30/08/2010 चे अनुक्रमांक ब(8) नुसार योजनेचा वार्षिक फलश्रुती अहवाल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांचेमार्फत आयुक्त पशुसंवर्धन यांना सादर करणे आवश्यक आहे.

9) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्घ व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो- 2010 / प्र.क्र.340 / पदुम-4, दिनांक 30/08/2010 चे अनुक्रमांक अ (1) नुसार लाभार्थीकडे दुभती जनावरे, शेतजमीन व सिचंनाची सोय असल्याबाबत अभिलेखे उपलब्ध करणे आवश्यक आहे, असे अभिलेखे दर्शविण्यात यावे.

**4.495 आदिवासी उपयोजनेतंर्गत 75 टक्के अनुदानावर 2 दुभत्या जनावराचे वाटपमधील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती माहुर, जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती माहुरचे सन 2016-2017 या कालावधीचे लेखापरीक्षणात पंचायत समिती अंतर्गत पशुसंवर्धन विभागाचे आदिवासी उपयोजने अंतर्गत दुधाळ जनावर गट वाटपावर शासन निधी रुपये 1,91,388/- व लाभार्थी हिस्सा 25 टक्के रुपये 63,795/- असे एकूण रुपये 2,55,183/- चा खर्च नोंदविलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मान्यतेमध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार अमंलबजावणी अधिकाऱ्याने या योजनेस सर्व प्रकारच्या प्रसिध्दी माध्यमाद्वारे व्यापक प्रसिध्दी देवून अर्ज मागविणे आवश्यक होते. परंतु, त्याप्रमाणे व्यापक प्रसिध्दी दिल्याचे अभिलेखे संचिकेत नाही.

2) योजनेचे मार्गदर्शक सुचनांनुसार सदर योजनेची देयके आहरित करतांना लाभ धारकाची यादी निश्चित करुन योग्य त्या तपशिलासह देयकासोबत जोडल्याशिवाय अनुदाने आहरित करण्यात येवू नये, असे स्पष्ट केलेले असतांना व देयकासोबत कोणतीही खरेदी प्रक्रिया केल्याचे अभिलेखे नसतांना नियमबाह्य रक्कम आहरित करुन पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती, माहुर यांना प्रदान केली आहे.

3) मार्गदर्शक सुचनांनुसार जनावर खरेदी प्रक्रिया दिनांक 31/03/2017 पर्यंत करुन खर्च करणे आवश्यक असतांना प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया दिनांक 08/09/2017 रोजी केलेली आहे. शासन नियमाप्रमाने वेळापत्रकाचे पालन केलेले नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) मार्गदर्शक सुचनांनुसार यायोजनेमध्ये एच.एफ.जर्सी या संकरीत गाई तसेच मुऱ्हा व जाफराबादी या सुधारीत जातीच्या म्हशी, प्रतिदिन 10 ते 12 लिटर दुध उत्पादन असलेल्या दुसऱ्या / तिसऱ्या वेतातील 15 ते 30 दिवसा पासून व्यालेल्या संकरीत गायी/म्हशीचे वाटप केल्याचे अहवाल संचिकेत नाही. दर्शवुन अनुपालन सादर करावे.

5) पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांच्या 25 टक्के जनावराची प्रत्यक्ष पडताळणी करावी. तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी 10 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करुन तसा अहवाल वरिष्ठांस सादर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अहवाल संचिकेत नाही. तपासणी अहवाल दर्शवुन अनुपालन सादर करावे.

6) लाभार्थ्यांने दुग्ध व्यवसाय / गाय म्हैस पालन विषयक प्रशिक्षण घेतल्याचे अहवाल संचिकेत नाही. प्रशिक्षण दिल्याचे अहवाल दर्शवुन अनुपालन सादर करावे.

7) सदर लाभार्थी दुभत्या जनावर गट वाटप पडताळणी पशुसंवर्धन अधिकारी यांचा अहवाल दिनांक 03/02/2017 नुसार लाभार्थी यांनी त्यांना वाटप केलेला दुभत्या जनावर गट विक्री केल्याने आज रोजी त्यांचेकडे दुभत्या जनावर गट नाही. त्यामुळे योजनेचा उदेश सफल झाला नाही. अनियमिततेबाबत खुलासा करावा.